

# गौरीची दिवाळी



डॉ. पवन मांडवकर

त्या पेटवून अंगणांत त्यांची आरास मांडतात. या उत्सवात सुट्यांची मौज, नातेवाईक, मित्रमंडळींच्या भेटीगाठी, वातावरणातील हलका गारवा, फराळांची रेलचेल, मिष्टान्न भोजन, पहाटेचे तेलमर्दन, उटण्यासह अभ्यंगस्नान, रंगीबेरंगी दिव्यांची आरास, फटाक्यांची आतिषबाजी, नवनवीन खरेदी यांमुळे ती केवळ धार्मिकदृष्टचा महत्त्वाची राहिली नसून आनंदोत्सवाचा सागर निर्माण करणारी, सुखसमृद्धी, आरोग्य आणि प्रसन्नतेची खैरात करणारी देवताच ठरली आहे.

⊗⊗⊗





महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समितीने
शासनमान्य यादीकरिता निवडलेले पुस्तक

# गौरीची दिवाळी

ISBN 978-81-925945-2-1

डॉ. पवन मांडवकर

***महाकवी एंटरप्रायजेस***
प्लॉट नं. ४२, ए वॉर्ड, दुसरा बसस्टॉप,
फुलेवाडी, कोल्हापूर ४१६ ०१०

गौरीची दिवाळी [Gaurichi Diwali]
© डॉ. पवन मांडवकर
(Dr. Pavan Mandavkar)
लेखक - संपर्क - भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८
१. एस-१, स्वामिनी अपार्टमेंट, टिळकवाडी, यवतमाळ
४४५००१; (०७२३२) २५२९७५
२. इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
४४५४०१; (०७२०१) २२६१२९ / २२६१४७
३. विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती
४४४ ६०६; (०७२१) २६७३३८६ / २६७७८५३
४. ए-१३ षिंदे नगर, बावधन, पुणे ४११ ०२१
(०२०) २२९५१५०१
५. ए-४/७, कासलीवाल क्लासिक, तापडिया नगर,
औरंगाबाद ४३१००५, (०२४०) २३५२३००
६. द्वारा डहाळकर, ९/१, ८२ एच.आय.जी., त्रिमूर्ती
नगर, नागपूर ४४० ०२२ (०७१२) २२३४०३२
मुखपृष्ठ : कु. चैताली जगताप, यवतमाळ
प्रकाशन नोव्हेंबर २०२२
प्रती १०००
प्रकाशक महाकवी एंटरप्रायजेस
गौरव महादेव शिपुगडे
प्लॉट नं. ४२, ए वॉर्ड, दुसरा
बसस्टॉप, फुलेवाडी,
कोल्हापूर
पूर्वप्रसिद्धी 'दीपोत्सव ९८', 'दै. हिंदुस्थान',
अमरावती, १९९८
'मुलांचे मासिक', नागपूर,
दिवाळी अंक २००४
मूल्य ६५ रुपये

# वसुबारस, भाऊबीज

वसुबारस म्हणजेच गोवत्स बारस किंवा गायवासराची पूजा. ही धनत्रयोदशीच्या आधी अश्विन वद्य द्वादशीला असते. त्याचप्रमाणे यमद्वितीया किंवा भाऊबीज ही कार्तिक शुद्ध द्वितीयेला साजरी करतात. या दिवशी यमीने यमाला ओवाळले होते. म्हणून सर्व भगिनी आपल्या भावाला पंचारतीने ओवाळतात. भाऊ आपल्या बहिर्णींना मनपसंत ओवाळणी घालतात. वास्तविक पूर्वी दिवाळी त्रयोदशी ते प्रतिपदा अशी चारच दिवस असे; पण वसुबारस आणि भाऊबीज हे दोन्ही दिवस या चार दिवसांच्या लागूनच मागेपुढे येत असल्याने आता या दोन दिवसांचा समावेश दीपावली सणात केल्या जातो.

दीपावलीच्या कालावधीत रोज सायंकाळी मातीच्या पणत्यांमध्ये तेलवाती घालून

बळीराजा आणि त्यांची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. त्यानंतर दीपदान, वस्त्रदानाने या व्रताची पूर्तता करतात.

हा दिवस म्हणजे विक्रम संवताचा वर्षारंभ दिन. प्रातःकाळी स्त्रिया स्नान करून पुरुषांना ओवाळतात. पतीकडून पत्नीला ओवाळणी घातली जाते. सकाळी लाडू, अनारसे, चकल्या, चिवडा अशाप्रकारचा फराळ मित्रमंडळींसमवेत ग्रहण केला जातो.

दुपारी पक्वान्नांचे भोजन होते. सायंकाळी नवीन वस्त्रे नेसून अलंकार घालून परस्परांना नववर्षाच्या आणि दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या जातात.

ग्रामीण भागात या दिवशी गोवर्धन पूजा करतात. शेणाचा पर्वत करून त्यास दुर्वा, फुले वाहतात. गोपाळकृष्ण, इंद्र यांची चित्रे मांडून त्यांची पूजा केली जाते.



# गौरीची दिवाळी

"…. तर मुलांनो, असे होते सानेगुरुजी. आता उद्यापासून दिवाळीच्या सुट्या सुरू होणार. या सुटीत तुम्ही असे एखादे चांगले काम करा की तुमच्या आईबाबांना तुमचा अभिमान वाटावा."

गुरुजींनी सांगितलेली

‘श्यामची आई’ ही गोष्ट गौरी आणि तिच्या मैत्रिणींना खूप आवडली. श्यामसारखं आपणही काहीतरी छान काम करावं, असं त्यांना वाटलं. मैत्रिणीशी बोलत बोलत गौरी घरी पोचली.

“काय गौरी, लागल्या नं





दिमडी वाजवून अललक्ष्मीला, दुष्टप्रवृत्तींना हाकलून लावतात.

पुराणातील कथेनुसार या दिवशी मध्यरात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करून आपल्या निवासासाठी योग्य स्थान शोधत असते. जिथे स्वच्छता, आरास, शोभा, दीपपूजन आढळते, जिथे चारित्र्य, कर्तव्य, संयम, धर्मनिष्ठा, भक्ती, क्षमा आणि प्रेम इत्यादी गुणांचा आढळ होतो, अशा घरात लक्ष्मी प्रवेश करते आणि निरंतर वास करते.

लक्ष्मीपूजनाच्या याच दिवशी विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवतांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले होते.

## बलिप्रतिपदा

कार्तिक शुद्ध प्रतिपदेला रात्री बळीची पूजा केली जाते. अंगणात रांगोळीने पंचरंगी

करतील, दीपपूजा करतील, त्यांना नरकाची पीडा देऊ नका.”

श्रीकृष्णाने हे मागणे मान्य केले. म्हणूनच नर्कचतुर्दशीला सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान व दीपपूजनाच्या व्रताचा आरंभ झाला.

## लक्ष्मीपूजन

अश्विन अमावस्येला प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वण श्राद्ध आणि ब्राम्हणभोजन आणि सायंकाळी लक्ष्मी, कुबेर, विष्णू आदी देवतांचे लाह्या, बत्तासे, झेंडूची फुले यांनी पूजन करून नैवेद्यासाठी लवंग, विलायची, साखर घालून तयार केलेल्या गाईच्या दुधाचा खवा वापरतात. धने, गुळ, लाह्या, बत्तासे प्रथम लक्ष्मीला वाहून नंतर सर्गींयांना देतात.

रात्री जागरण करून मध्यरात्री सूप व




दिवाळीच्या सुट्या? बघ, तुझ्यासाठी आई कसे छानछान फराळाचे पदार्थ तयार करते आहे.” बाबांनी असे म्हणताच गौरीने दप्तर ठेवून हातपाय धुतले व स्वयंपाकघर गाठले.

“आई, तुला मी मदत करते. तू मला सगळा फराळ बनवायला शिकव नं.”

आईला गंमत वाटली.

“अग, तू अजून लहान आहेस. तुला ही कामे जमणार नाहीत.”

“नाही आई, तू मला



शिकवच."

गौरीचे रडके स्वर ऐकून पुढल्या दोन दिवसांत आईने तिला शंकरपाळे, चकल्या, शेव व लाडू बनविण्यास शिकवले.

तिसऱ्या दिवशी सकाळी सहा



करतात. सायंकाळी सूर्यास्तानंतर दीपदान करतात. तसेच शिवपूजा आणि नक्तभोजन असा या दिवशीचा यथासांग विधी असतो.

यासंबंधी पुराणातली कथा अशी की, प्रागज्योतिषपुराचा राजा नरकासूर भूदेवीकडून वैष्णवास्त्र प्राप्त झाल्यामुळे अतिबलाढ्य झाला. त्याने स्वर्गातील सर्व देवतांना त्रास देण्यास प्रारंभ केला. इंद्राच्या ऐरावताचे आणि अनेक राजांच्या सोळा हजार एकशे आठ कन्यांचे त्याने हरण केले. सामान्य प्रजेवरही जुलूम, जबरदस्ती आणि अत्याचार सुरू केले. इंद्रसुद्धा हवालदिल झाला. त्याने श्रीकृष्णाची मनोभावे प्रार्थना केली. नरकासुरापासून प्रजेचे रक्षण करण्यासाठी विनविले. त्यानुसार श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला. मरताना नरकासुराने एक मागणी केली. तो म्हणाला,

"देवा, आजच्या दिवशी, अश्विन वद्य चतुर्दशी या तिथीला जे कोणी मंगलस्नान

आम्ही आपल्या आज्ञेनुसार जेव्हा त्याचे प्राणहरण करावयास गेलो, तेव्हा तिथला आक्रोश आम्हाला पाहवेना. महाराज, अशा तरुण जीवांचा किंवा बालकांचा अपमृत्यू टाळण्यासाठी आपण काही उपाय सांगाल का?"

तेव्हा यमराज म्हणाले,

"धनत्रयोदशीच्या दिवशी जे कोणी दीपदान, व्रतउपासना करतील त्यांना अपमृत्यू येणार नाही."

याच दिवशी आयुर्वेदप्रवर्तक धन्वंतरी यांचीही जयंती साजरी केली जाते.

## नर्कचतुर्दशी (नरकचतुर्दशी)

अश्विन वद्य चतुर्दशीला सूर्योदयापूर्वी अंगाला तेलाचे मर्दन करून उटणे लावून स्नान करतात. नंतर यमराजाला वंदन करून ब्राम्हणभोजन घालतात. त्यांना भारी वस्त्रे दान



वाजता गौरी उठली.

"अग गौरी, इतक्या लवकर उठलीस? दिवाळीच्या सुट्या सुरू झालेल्या आहेत नं?"


"आई, मला सकाळीच मैत्रिणीकडे जायचं आहे."


आईला आश्चर्य वाटलं. कधी नव्हे ते गौरी आज सकाळी स्वतःहून



उठून तयार झाली व मैत्रिणीकडे गेली. त्यानंतर दररोज तिचा हाच कार्यक्रम सुरू झाला.

दिवाळी सुरू झाली. पहाटे उठून, दिवा ओवाळून, चंदनाचे सुगंधी उटणे लावून, अभ्यंगस्नान करून, छानछान नवे कपडे घालून प्रसन्न वातावरणात शेजाऱ्यापाजाऱ्यांचे एकमेकांकडे येणे सुरू झाले. फटाके फुटू







करतात. गणपती, कुबेर, विष्णू आणि लक्ष्मी या चार देवतांचा पूजनात प्रामुख्याने समावेश असतो. अखंड दीप प्रज्वलीत ठेवून पायसाचा नैवेद्य आणि परोपकारी कृत्य ही या दिवसाची आवश्यक कर्मे मानतात, असे हे वैशिष्ट्यपूर्ण व्रत आहे.

या व्रताची कथा अशी की, यमदेवतेने दुतांना विचारले, “तुम्ही जेव्हा प्राणहरण करता, तेव्हा तुम्हाला दुःख वाटत नाही का? त्या दुर्दैवी जीवाची दया, करुणा येत नाही का?”

त्यावर दूत उत्तरले, “आम्हाला तर दुःख होतेच; पण आपली आज्ञा पाळणे आमचे कर्तव्य आहे. एकदा हेमराज राजाला पुत्र झाला. षष्टीपूजनाच्या दिवशी सटवीने येऊन सांगितले की, हा मुलगा लग्नानंतर चौथ्या दिवशी मृत्यू पावेल. ते ऐकून राजा भयभीत झाला. त्याने अतिशय सुरक्षितपणे मुलाला वाढविले. त्याचा विवाह होताच त्याला एका गुहेत लपवून ठेवले.

“हे देवाधिदेवा, मी केवळ लोककल्याणाच्या हेतूने दान मागतो की, अश्विन वद्य त्रयोदशी, चतुर्दशी आणि अमावस्या या तीन दिवसांत जो कोणी यमाप्रित्यर्थ दीपदान करील, त्याला यमयातना भोगाव्या लागू नयेत. त्याच्या घरी निरंतर लक्ष्मीचा वास असावा. कृपाकरून माझे हे मागणे पूर्ण करावे.”


विष्णूने ‘तथास्तु’ म्हणून बळीला वरदान दिले. तेव्हापासून या विशिष्ट कालावधीत दीपदान आणि दीपोत्सवास प्रारंभ झाला.

## धनत्रयोदशी

दीपावलीची सुरुवात धनत्रयोदशीने होते. यमराजाला प्रसन्न करण्यासाठी या दिवशी तेलाचे दिवे लावून दीपदान केले जाते. अलंकार, दागदागिने, चांदीची भांडी घासूनपुसून स्वच्छ केली जातात. उपवास करून धनलक्ष्मीची पूजा



लागले. फराळाची रेलचेल सुरू झाली. अशात एक दिवस गौरीच्या आईच्या



लक्षात आले की, घरातील छोटी कढई, पातेले, डबा, ताटवगैरे काही भांडी आणि थोडेफार धान्य घरातून नाहीसे

झाले आहे. तिने ही गोष्ट गौरीच्या बाबांना सांगितली. त्यांनाही आश्चर्य वाटले. यापूर्वी कधी अशी चोरी त्यांच्याकडे झाली नव्हती. नेमकी हीच गोष्ट काही शेजाऱ्यांकडेही घडली. दिवाळीच्या शेवटच्या म्हणजे पाडव्याच्या दिवशी सगळी मंडळी गौरीच्या बाबांकडे जमली. भांडी नाहीशी झाल्याबद्दल चर्चा सुरू झाली.

"खेळण्यासाठी मुलींनीतर घेतली नसतील भांडी?"

"रोज सकाळी ह्या जातात तरी कुठे?"



धारण केला आणि बळीराजाच्या यज्ञसमारंभात प्रवेश केला. याचकांना इच्छादान देणाऱ्या बळीने वामनास दान मागण्यास सांगितले. तेव्हा वामनाने त्रिपाद भूमीची याचना केली. बळीने मान्य करताच वामनाने आपले एक विराट पाऊल पृथ्वीवर ठेवले व सर्व पृथ्वी व्यापून टाकली. लगेच दुसरे पाऊल स्वर्गात ठेवून स्वर्गही पादाक्रांत केला. तिसरे पाऊल ठेवण्यास कुठेही जागा नाही, हे त्याने बळीच्या निदर्शनास आणून दिले व 'हे पाऊल कुठे ठेवू?' असा प्रश्न केला. दानशूर बळीराजाने क्षणाचाही विलंब न लावता 'ठेव माझ्या माथ्यावर' असे म्हटले व तो नतमस्तक झाला. विष्णूने वामनरूपात बळीच्या शिरावर पाय ठेवून त्याला पाताळात ढकलून दिले. ही घटना घडायला त्रयोदशी ते अमावस्या असे तीन दिवस लागले. नंतर कार्तिक प्रतिपदेच्या दिवशी विष्णूने बळीवर प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले. तेव्हा बळी म्हणाला,



साजरा केला जातो. आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध प्रतिपदा हे चार दिवस प्राचीन काळापासून दिवाळीचे म्हणून मानले जातात.

दीपावलीसंबंधी वेगवेगींया कथा आढळतात. पुराणातील कथा अशी की, सर्वशक्तिमान बलाढ्य अशा बळीराजाने संपूर्ण पृथ्वी जिंकली. आणि सर्व देवदेवतांना बंदी केले. त्यांच्या सुटकेसाठी विष्णूने वामनावतार



“नक्कीच काहीतरी गडबड आहे.” अशी चर्चा सुरू असतानाच मैत्रिणींसह गौरी बाहेरून आली. तिच्या हातात घरातून नेलेली भांडी होती. ते पाहताच भांडी चोरी जाण्याचे रहस्य उलगडले. गौरीच्या आईच्या तळपायाची आग मस्तकात गेली. ती ओरडली,

“गौरे, कुठे गेली होतीस भांडी घेऊन? आम्ही इथे समजतोय, भांडी चोरी गेलीत म्हणून; आणि तू ही भांडी नेली होतीस? थांब, आता तुला चांगलीच शिक्षा करते.

आजपासून तुला दिवाळीचा फराळ बंद.”

गौरी रडू लागली. तिच्या मैत्रिणींनाही त्यांच्या घरच्यांनी हीच शिक्षा दिली. रडत रडत गौरी काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती; पण कोणीच तिचे म्हणणे ऐकून घेईना.

त्या दिवसापासून गौरीला फराळ मिळणे बंद झाले. आईने तिच्याशी कट्टी केली. दुःखी गौरी निमुटपणे गच्चीत आपल्या बाहुलीशीच बोलत बसायची. गौरीला आपली चूक



# दीपावली

बालमित्रांनो, तुम्हाला दीपावलीच्या सणाविषयी माहिती आहे का? असेल तर फारच छान! पण ज्या चिमुकल्यांना माहिती नसेल, त्यांच्याकरिता खास ही माहिती, बरं का!

शरद ऋतूच्या सुखद गारव्यात आणि आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकाळात येणारा दीपावलीचा सण काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून ब्रम्हदेशापर्यंत सर्वत्र आनंदाने आणि उत्साहाने

दिला होता. त्यासाठी त्यांना स्वतःच्या हक्काचा फराळही गमवावा लागला होता; पण अनाथांच्या दिवाळीला एका सुंदर व आदर्श ढंगात सजवून त्यागातूनही खूप मोठे पारितोषिक त्यांनी पटकावले होते, शाबासकीचे!



कळावी, पुन्हा कधी तिने असे करू नये, म्हणून तिला ही कठोर शिक्षा करण्यात आली होती.

दोन दिवसांनी गौरीच्या आईबाबांना जवळच्याच एका अनाथाश्रमातील कार्यक्रमाचे निमंत्रण आले. त्या कार्यक्रमात गौरीचे गुरुजी प्रमुख अतिथी म्हणून राहणार होते. कार्यक्रमात गौरीलाही तिच्या आईबाबांनी नेले. तिथे गौरीच्या मैत्रिणीपण होत्या. कुणाचातरी सत्कार होणार होता. स्टेजवर अनाथाश्रमाचे अध्यक्ष व गौरीचे गुरुजी बसले होते.

अध्यक्षांनी भाषणास सुरुवात केली.

“बंधू-भगिनींनो व छोट्या दोस्तांनो, स्टेजवर आम्हा दोघांनाच पाहून तुम्हाला प्रश्न पडला असेल, की सत्कार कोणाचा होणार आहे? मित्रांनो, इकडे बाजूला आमच्या आश्रमातील गरीब, अनाथ मुले-मुली बसली आहेत. त्यांच्या जीवनात आनंद कमी आणि दुःख अधिक आहे. येणारा प्रत्येक सण त्यांना रोजच्यासारखाच भासतो. दिवाळी येते आणि जाते; पण त्यांना कधी पोटभर फराळही मिळत नाही. परंतु ही दिवाळी मात्र



अभिमान वाटला पाहिजे.” गौरी रडत रडत बोलत होती.

“गौरी, माझ्या बाळा, खरंच तुझा अभिमान वाटतो गं आम्हाला. तू खूप मोठं काम केलं आहेस आज.”

गौरीच्या आईने तिचे खूप पापे घेतले. मग तिच्या सगींया मैत्रिणींना जवळ घेतले. गौरीच्या मैत्रिणींच्या आईबाबांनाही खूप आनंद झाला. गुरुजींनी सगींया मुलींची पाठ थोपटली. या छोट्या छोट्या मुलींनी स्वतःच्या कोवींया हातांनी दिवाळीचा फराळ बनवून अनाथ मुलामुलींना

गौरीला पोटाशी कवटाळले आणि ती हमसून हमसून रडू लागली.

“गौरी, मला माफ कर. मी समजून न घेताच तुला शिक्षा केली. तुझं म्हणणंही ऐकून घेतलं नाही.”

“आई, तू रडू नकोस. माझंच चुकलं. मी तुला न विचारता भांडी न्यायला नको होती. मी पुन्हा कधीच तुला न सांगता घरून काही नेणार नाही. पण तू माझ्याशी दोस्ती कर. कट्टी नको घेऊस गं! गुरुजींनी सांगितलं होतं, की असं काहीतरी करा, की तुमच्या आईबाबांना तुमचा



त्यांच्यासाठी अत्यंत आनंदाची ठरली. त्यांच्या जीवनात प्रथमच त्यांना पोटभर फराळ मिळाला. हा आनंद त्यांना दिला, तो एका चिमुरड्या दहा वर्षांच्या बालिकेने आणि तिच्या मैत्रिणींनी. बाहुली खेळावयाच्या नाजूक हातांनी दिवाळीचा फराळ बनवून आणला. तो खूप चविष्ट, खुसखुशीत व योग्य आकारात होता, असे नाही;



पण या अनाथ बालकांसाठी तो पंचपक्वान्नांपेक्षाही रुचकर ठरला. त्यांची खरी दिवाळी यंदा साजरी झाली. जिने हा आनंद त्यांच्या जीवनात आणला, त्या चिमुरडीचा सत्कार आपण गुरुजींच्या हस्ते करणार आहोत."

बोलता बोलता काही क्षण अध्यक्ष थांबले. जमलेल्या सर्गीयांनाच प्रश्न पडला, की ही चिमुरडी कोण असेल? अध्यक्ष पुढे म्हणाले,

"गौरी, ये बाळ स्टेजवर. तुझ्या मैत्रिणींनाही घेऊन ये."



सर्गीयांना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. निरागस गौरी तिच्या मैत्रिणींसह स्टेजवर पोचली. गुरुजींनी



त्यांचा सत्कार केला. टाींयांचा प्रचंड कडकडाट झाला. गौरीच्या आईबाबांच्या डोींयांत अश्रू उभे झाले. निरागस, निरपराध गौरीला शिक्षा केल्याबद्दल त्यांना दुःख झालं. गौरीची आई धावतच स्टेजवर गेली. तिने